७०८
विषय किशोर ८८.

# आभाळ मित्र

( भाग १ )

राजा मंगळवेढेकर

बालवाडी प्रकाशन

किर्लोस्कर प्रेस, पुणे ९

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा-वा.
दा. क्र. १०८

दा. क्र. १०८
विषय किशोर

BVBK-0400108

✣ बालवाडी प्रकाशन : ८

✣ आभाळ मित्र

✣ राजा मंगळवेढेकर

✣ सर्व हक्क लेखकाधीन

✣ पहिली आवृत्ती, मे १९७७

✣ मुद्रक व प्रकाशक
श्री. मु. शं. किर्लोस्कर
किर्लोस्कर प्रेस,
वीर सावरकर नगर, पुणे– ४११००९

✣ मुखपृष्ठ व आतील चित्र
सुभाष अवचट, पुणे

✣ किंमत : रु. ४–२५

# अर्पणपत्रिका

प्रिय

रावसाहेब शिंदे, एम्. के. पाटील व एम्. आर. चिटणीस


यांना सस्नेह–

BVBK-0400108

# पानसाखळी

१) चिमणी
२) कावळा
३) पोपट
४) मोर
५) कोंबडा
६) कबूतर
७) कोकीळ
८) बुलबुल
९) खंड्या
१०) सातभाई
११) सुतार
१२) बगळा
१३) बदक
१४) राजहंस
१५) कोतवाल

# चिमणी



झाडाझुडुपांनी गजबजलेले अंगण असावे. अशा हिरव्या अंगणाने वेढलेले घर असावे. आणि अशा घरात आपण राम-प्रहरीच उठावे. म्हण-जे 'चिवचिवणारी सकाळ' कशी असते हे आपल्याला उमगून जाईल! या मंजूळ चिवचिवण्याचे बोट धरून आपण सहज आपल्या बाल्यात प्रवेश करू शकतो. बाल्य म्हणजे केवढे ? असू महिन्या दोन महिन्यांचे ! तिथे पोचल्यावर काय आठवते? दुसरे तिसरे काही नाही. केवळ आईने, आजीने वा ताईने कडेवर घेऊन समोरच्या झाडाकडे हात दाखवून म्हटलेले एक चिमुकले गाणे : 'चिव चिव ये, दाणा खा, पाणी पी, भूर्रकन् उडून जा !'

आणि या पाठोपाठ, मिटुकल्या पंखांनी हवेत काढलेल्या कितीतरी वेलांटचा ! भुर्रर्रऽऽ भुर्रर्रऽऽऽ भुर्रर्र ऽऽऽ...

मग दिवसामागून दिवस जातात, महिने जातात, आपण मोठे होतो. आणि मग आई, आजी किंवा ताई कुशीत घेऊन गोष्ट सांगतात : 'एक होती चिमणी आणि एक होता कावळा. चिमणीचं घर होतं मेणाचं आणि कावळ्याचं घर होतं शेणाचं...' आपण 'हूं हूं' असा हुंकार भरीत गोष्ट ऐकतो आणि चिमणीशी आपली गट्टी जमते. मेणाचं घर बांधणाऱ्या शहाण्या चिमणीबद्दल आपल्याला जिव्हाळा, प्रेम, जवळीक वाटू लागते. चिमणीशी आपली ओळख अशी आपल्याला कळायच्या पूर्वी न कळतच होऊन जाते !

एवढीशी चिमणी नंतर रोज भेटते. ती मोठी धीट असते. अंगणात किलबिलाट करून यांचा घोळका गर्दी उडवून देतोच, पण घरातही सर्वत्र यांना प्रवेश असतो. दार उघडे असले तर ठीकच. नाहीतर खिडकीतून, झडपेतून, वळचणीच्या फटीतून, जिथून भुरकांडी मारता येईल तिथून चिमण्या घरात येणार. सोप्यात, बैठकीत, माजघरात,स्वयंपाकघरात सगळीकडे फिरणार. खुंटीवर, दांडीवर, दोरीवर सापडेल त्यावर बसणार. फोटोच्या मागे, छपराच्या सांदीत, कपाटाच्या आडोशाला जागा मिळाली तर तिथेच काडी काडी आणून खोपा रचणार, तुमच्या आमच्या भरंवशावर खोप्यात तांबूस-पांढरी अंडी घालणार. ती उबवणार. योग्य काळी त्यातून पिलं बाहेर येणार आणि मग आणखी चिवचिवाट वाढणार ! एकदा नव्हे वर्षातून तीनदा ! नुसता दंगा !

मग आपणदेखील त्रासून म्हणणार, 'भंडावलं बुवा ह्या चिमण्यांनी अगदी !'

पण तुम्ही खुशाल काही म्हणा, वा ' शुक् शुक् ' करून टाळी वाजवून हाकला. चिमणी येणार. पुन्हा पुन्हा येणार !

भाताची शितं, भाकरी-पोळीचे तुकडे, ज्वारी-बाजरीचे किंवा गहू–तांदळाचे दाणे चिवचिव करीत टिपणार. किडुक–मिडुक, जीवजंतू, अळीदेखील मटकावणार. दिवाणखान्यातल्या मोठ्या आरशात मुरकून, मुरकून पाहणार. आरशात दिसणाऱ्या चिमणीला बोलावणार. त्यासाठी आरशाच्या विलोरी काचेवर एकसारखी चोच आपटीत राहणार !

तसं पाहिलं तर मूठभर जीव ! पांढऱ्या कबऱ्या रंगाच्या चिमणीची चोच लहानसर आणि आखूड असते. पण ती बळकट आणि रुंद असल्यामुळेच चिमणीला चुटूचुटू दाणे टिपता येतात.

चिमणीचे चिमणोबा मोठे फक्कड असतात. त्यांच्या माथ्यावरचा रंग करडा असतो आणि गाल मात्र पांढरे–गोरे असतात. हनुवटीपासून खाली छातीपर्यंत काळ्या नेकटायसारखी सुरेख पट्टी असते. इवलीशी पिसे पिंगट-करडी दिसतात. एवढासा जीव उडून उडून उडणार किती ! बेताचेच उडणे, बेताचेच चालणे. अंगणात वा ओसरीवर कीडमुंगी शोधताना टुणटुण उड्या मात्र पाहण्यासारख्या !

पाय पडले बारीक आणि अंग त्या मानाने अमळ मोठे. त्यामुळे शरीर पेलण्याची कसरत करावी लागते. पायांना पुढे तीन व मागे एक अशी चार-चार बोटे असतात. चिमण्या करतात थोडेच, पण बोलतात फार! ऐकणाराचे डोके पिकते, पण त्या मात्र मान वेळावीत वेळावीत सारख्या बोलत असतात ! बोलभांड कुठल्या.

चिमण्यांमध्ये ' आंधळी चिमणी ' म्हणून एक जात असते. अस म्हणतात की, तिला कानांनीही ऐकू येत नाही. कारण दाट

केसाळ पापण्यांनी तिचे कान म्हणे झाकलेले असतात. असते भुरकट-काळीच. पण दिवसभर भुईवर पसरलेल्या वाळल्या गवतात किंवा पानात दडून बसते. रात्र होईल तसतसे तिला दिसू लागते. दिवसांधळीच म्हणायची ! आणखी एक गंमत म्हणजे, उडताना हिच्या पंखांचा बिलकूल आवाज होत नाही. चिडीचिप मामला! ही खोपाही बांधीत नाही. आडोसा पाहून अंडी घालते. मळकट रंगाची. जन्मल्यावर पिलं सात दिवसपर्यंत डोळेच उघडत नाहीत!

या चिमणीला कुठे कुठे 'क्षपा' म्हणतात. बंगालीत 'डामचुरी' म्हणतात, हिंदीत 'अंधी चिडिया' तर तेलुगुमध्ये 'कट्टापित्ता' म्हणतात.

आपली जिच्याशी लहानपणी गट्टी जमते ती चिमणी 'चिऊ' नावाची असते. चिऊ अनेक परीकथांतून आणि बाळगाण्यांतून आपल्याला भेटते :

ये ग, ये ग चिऊ दोघं मिळून जेवू
गोड गाणी गाऊ भुर्ररं उडून जाऊ

# कावळा

शाळेत पाऊल ठेवण्यापूर्वीच शाळेची नि माझी ओळख झाली ती कावळयांच्या शाळेशी. आमच्या पंढरपूरच्या घराच्या डाव्या–उजव्या हाताला दोन वृद्ध पिंपळाची झाडे उभी आहेत. आणि अजूनही त्या पिंपळावर दररोज संध्याकाळी कावळयांची शाळा न चुकता भरत असते. दिवसभर शांत असणारी ही म्हातारी झाडे त्यावेळी दिवस मावळायच्या वेळी मात्र विलक्षण गजबजून उठायची. कावकावच्या आवाजाने कोंदाटून जायची. पंखांच्या फडफडाटाने तरणीताठी वनायची ! दिवसभर कुठे कुठे हिंडत असणारे कावळे झुंडीझुंडीने पिंपळावरच्या शाळेत यायचे, कलकलाट करायचे. मग थोड्या वेळाने रात्रीचे मास्तर अंधाराची छडी हातात घेऊन यायचे नि पिंपळावरची शाळा चिडीचूप व्हायची.

माणसाने न पाळता पाळलेला पक्षी म्हणजे कावळा ! कावळयाला माणसाची संगत–सोबत असल्याशिवाय चैनच पडत नसावे. माणूस जाईल तिथे कावळा जाणार. धुडकावले तरी राहाणार आणि उष्टे-माष्टे, सडके-कुजके, काय मिळेल ते खाऊन जगणार ! खाण्या-पिण्याच्या बाबतीत जसा तो चवचाल नाही, तसाच राहाणीतही ऐषआरामी नाही. झाडाच्या खोबणीत बांधलेले कावळयाचे घरटे तसे ओबड-धोबडच असते. त्यात सुग्रणपणा कमीच. स्वच्छतेशी वाकडे असल्यासारखीच स्वारीची वागणूक. चोचभर पाणी मिळाले की झाली आंघोळ ! झटपट मामला. घाईगर्दीत

असणाऱ्या माणसांनीही 'कावळ्याची आंघोळ' कधीकधी उचललेली दिसते.


कावळा काळा कुळकुळीत असतो. पण त्याचे काळेपणही किती तुकतुकीत! छातीचा आणि मानेचा भाग भुरकट राखी दिसतो. पंख काळे खरे, पण त्यांच्या पिसांवरही निळसर, हिरवट अशी चमकदार झाक असते. दीड फूट लांबीच्या कावळ्याचे पंख भक्कम असतात. पायांना पुढे तीन आणि मागे एक अशी चार बोटे असतात. कावळ्याची चोच सरळ, लांब व तीक्ष्ण असते या चोचीने कावळेकाका काय काय टोचत राहतील ह्याकडे काणाडोळा करणेच बरे.

कावळ्याचे हे घाणेरडे उद्योग पाहिले म्हणजे वाटते की कावळा हा पक्ष्यांतला मेहेतर असावा! आजूबाजूची सडकी, कुजकी घाण फस्त करून कावळेकाका माणसांवर उपकारच करत असतात. तुलसीदासांनी त्याला 'चांडाल पक्षी' म्हटले आहे.

कावळा तसा धीट असतो. कुणाच्याही अंगणात, घरात केव्हाही शिरतो, खायचे पदार्थ घेऊन पळतो. म्हणूनच त्याला 'अनिमंत्रित अतिथी' म्हटले आहे.

स्वारी तशी स्वार्थी नाही. काही लभ्यांश दिसला तर 'काव काव'चा ओरडा करून आपल्या साऱ्या जातभाईंना बोलावणार आणि त्यांच्यासह ताव मारणार. या त्याच्या स्वभावावरून तो लोकशाही वृत्तीचा व समाजवादीनिष्ठेचा वाटतो!

कावळा मोठा हुषार, चलाख आणि सावध पक्षी आहे. त्याच्या सावधपणावरून 'काक–चेष्टा' असा शब्दप्रयोग हिंदी भाषेत रूढ झालेला आहे. काक–चेष्टा म्हणजे सावधगिरी बाळगून, दक्ष राहून आपल्या कामात रमून जाणे. कावळा घराच्या छपरा-



वर वसून ओरडू लागला म्हणजे 'पाहुणे येणार' अशी समजूत रूढ आहे. यामुळेच खेड्यापाड्यातील सासुरवाशिणींना कावळ्याचे आगमन शुभ व आनंददायी वाटे. कित्येकजणींनी आपल्या माहेरी निरोप पाठवायला कावळ्याचीच नियुक्ती केलेली लोकसाहित्यात आढळते. कावळा हा पुराण पक्षी आहे. वेदांनीही त्याची स्तुती गायली आहे. वेद म्हणतात, "कावळा वस्ताद असला तरी स्वभावाने मोठा निर्मळ आहे. सगळ्यांना घेऊन खाण्याची त्याची वृत्ती आहे. कुत्र्याला हत्तीचे शरीर मिळाले तरी तो कंजूष प्राणी

दुसऱ्याला देणार नाही. पण कावळ्याचे तसे नाही. तो उदार आहे."

बौद्धसाहित्यात कावळ्यावर रचलेले ' काक-जातक ' प्रसिद्ध आहे. संत तुलसीदासांनी कावळ्याच्या चतुरपणाचा उल्लेख केला आहे. प्रभू रामचंद्र लहान असतानाची गोष्ट. ते काही खात असताना एक कावळा झेपावत आला आणि त्यांच्या खाण्यासाठी उघडलेल्या तोंडातून पोटात शिरला ! तिथे त्याला सारे ब्रह्मांड दिसले. नंतर कसातरी तो बाहेर आल्यावर रामांनी त्याला वर मागण्यास सांगितले. परंतु कावळ्याने धन, ऐश्वर्य, राज्य असे काहीच न मागता मागितली ती केवळ त्यांची भक्ती ! रामप्रभूही प्रसन्न झाले. त्यांनी वर दिला, " माझ्या आशीर्वादाने सर्व शुभगुण तुझ्या हृदयात वास करतील." हाच कावळा पुढे ' भृशुंडी ' नावाने पुराणात प्रख्यात झाला.


कावळ्यासंबंधाने आणखी अेक कथा रामायणात आहे. राम-सीता वनातून जात असताना जयंत नावाच्या एका कावळ्याने सीतेच्या शरीरावर चोच मारून जखम केली. रामांनी त्या काव-ळ्याचा एक डोळाच फोडून टाकला. जयंत नावाचा हा कावळा ' शक्रज ' म्हणजे इंद्राचा पुत्र होता असे पुराणांनी म्हटले आहे. कावळ्याला ' शक्रज ' म्हणतातच; आणि याच कथेवरून कावळा काणा असतो अशी लोकोक्ती प्रचलित झाली असावी. त्याच्या दोन डोळ्यांत मिळून एकच वाहुली असते अशीही समजूत आहे, पण ती गैर आहे.

या सावध पक्ष्याला कोकिळाताई मात्र सहज बनवतात. त्या आपली अंडी कावळ्याच्या घरट्यात ठेवून देतात आणि कावळीण-

बाई ती उबवीत बसतात. कावळेकाका राखण करतात. ती एकसारखीच असतात म्हणून ही फसगत ! कावळीणबाई एक वर्षाच्या होताच अंडी घालू लागतात. भारताच्या उत्तरेकडील आणि पश्चिमेकडील कावळीणवाई जून-जुलै महिन्यात, तर अन्य ठिकाणच्या एप्रिल-मे महिन्यात एके वेळी अनेक अंडी घालतात. श्रीलंका, पाकिस्तान, ब्रम्हदेश आणि आशियाई देशांत आणि विशेषत: भारतात तर कावळे खूप आढळतात. एका परदेशी चित्रकाराने भारताची यात्रा केल्यावर 'सात सूर्य आणि कावळेच कावळे !' असे एक भारताचे चित्र काढले. त्याचा अर्थ असा होता की, सात सूर्य म्हणजे भारत हा उष्ण प्रदेश आहे आणि कावळा हा पक्षी भारतीय जीवनापासून अलग करता येत नाही.

कावळ्याला अशुभ मानण्यात येत असले तरी श्राद्धपक्षाला त्याची वाट पाहावी लागते. पितरांच्या स्वरूपात तो शुभ मानण्यात येतो.

# पोपट



दिग्विजय मिळवण्याच्या हेतूने जगद्‌गुरू शंकराचार्य, आपले प्रतिस्पर्धी मंडनमिश्र यांच्याकडे निघाले होते. नगरात प्रवेश करताच एका दासीला त्यांनी मंडनमिश्रांचे घर कोठे आहे म्हणून विचारले. दासीने सांगितले,

"भगवन्, ज्यांच्या दारातील पिंजऱ्यामधील पोपट वेदातील ऋचा म्हणत असेल, तेच पंडित मंडनमिश्रांचे घर आहे असे समजा."

शंकराचार्य नगरात गेले. एका घरापुढे पोपटाचा सुरेख पिंजरा टांगलेला त्यांना दिसला आणि खरोखरच पिंजऱ्यामधील पोपटाचे वेदपठण चालले होते !

पोपट हा बोलणारा पक्षी आहे. माणसासारखी वाणी पोपटाशिवाय अन्य कोणाही पशू पक्ष्याला नाही. 'मिठू मिठू बोल' ची धून आपल्या परिचयाची आहेच !

पोपट जसा बोलका, तसा देखणा. पोपटी हिरवा रंग, लालभडक बाकदार चोच, कंठावर काळी शोभिवंत रेघ, निळसर झाक असलेली लांब शेपटी, आखूड दोन पाय आणि गोल गरगरीत, पाणीदार पण लहान डोळे! असा अगदी ओंजळभर राघू सर्वांना आवडतो. भुलवतो. पुष्कळ घरी मोठ्या हौसेनं पाळला जातो. निरनिराळ्या आकाराचे नि धातूंचे सुरेख पिंजरे त्याच्यासाठी बनवले जातात. हिरव्यागार मिरच्या, पेरू, बोरे डाळिंबाचे दाणे, भिजलेली डाळ अशा खाद्यपदार्थांवर पिंजऱ्याच्या दांडीवर बसून ताव मारत असलेल्या पोपटाला मात्र बाहेरच्या मोकळ्या हवेची आवड अधिक! तसा हा पक्षी स्वातंत्र्याचा मोठा भोक्ता आहे. रानावनात थव्याथव्याने राहाणे एकदम पसंत!

फळबागा शोधीत हिरव्या राघूंचा थवा निळ्या आभाळातून चिवचिवाट करीत जाताना अनेकवेळा दिसतो. गर्द हिरव्या झाडांवर या स्वाऱ्या उतरल्या तर ओळखूही येत नाहीत. पानांचा आणि यांचा रंग सारखाच. झाडाला राघूंची पाने फुटतात की राघू पान पान बनून जातात, कोण जाणे!

बाकी कसलेही कठीण कवचाचे फळ पोपट चटकन् फोडून खातात. त्यांची लालबुंद चोच बाकदार आणि धारदार असते. पुढच्या टोकदार भागाच्या मानाने मागचा चोचीचा भाग थोडा रुंद आणि मोठा असतो. जीभही जरा जाडच असते.

पायाच्या चार बोटांमुळे झाडाची फांदी गच्च धरून बसता येते. चार बोटांपैकी दोन पुढे आणि दोन मागे असतात.

अनुकरणाने आवाज काढण्याचे कसब पोपटांच्या जवळ आहे. शिकवाल तसे बोलतील, शीळ घालतील, नकला करतील. नाही तर

कर्कश आवाजात चित्कारत राहतील. म्हणूनच पढवलेल्या माणसाला 'बोलका राघू' किंवा 'पोपटपंची' म्हणतात!

पोपट हा पक्ष्यांतला 'ब्राह्मण' असावा. त्याच्या वाणीवरून नव्हे. पण तो आंघोळप्रिय आणि पूर्ण शाकाहारी आहे! पाळीव पोपटाला रोज आंघोळ घालावीच लागते. पण रानावनातले पोपटदेखील नदीच्या, तळ्याच्या शोधार्थ दूरपर्यंत जातात. तास-तास सचैल स्नान करीत बसतात. काकस्नान त्यांना नामंजूर असते! पोपट म्हटला की हिरव्या रंगाचा गुबगुबीत पक्षी आपल्या डोळ्यांपुढे येतो. कारण आपल्याकडे अशाच रंगाचे पोपट आहेत. परंतु काही ठिकाणी लाल रंगाचे किंवा शुभ्र अंगाचे पोपटही दिसतात. भारत, आफ्रिका, दक्षिण अमेरिका आदी देशात पोपट फार आढळतात.

भारतात प्राचीन काळापासून पोपटांची वस्ती आहे. भारतीय पुराणात पोपटाला 'कामदेवा'चे वाहन म्हणून उल्लेखलेले आहे. महाकवी कालिदासाने 'रघुवंशा'त अजराजाच्या स्तुतीसाठी पोपटाचीच नियुक्ती केली आहे. संस्कृतमध्ये त्याला 'शुक' म्हणतात. बाणभट्टाच्या 'कादंबरी'त शुक-आख्यानच आहे.

पोपटाच्या वाणीमुळे तिबेटात त्याला शुभ आणि सन्माननीय मानण्यात येते. दलाई लामाची जेव्हा मिरवणूक निघे तेव्हा लामाबरोबर त्याचा पाळीव पोपटही असे. रस्त्याने तो पोपट बोलत जायचा आणि लामाचा हा पोपट ईश्वराचा संदेश देत आहे अशी तिबेटी लोकांची श्रद्धा!

बुद्धत्व प्राप्त करून घेण्यासाठी गौतमालाही पोपटाचा जन्म घ्यावा लागला होता.

पोपटाच्या शहाणपणाच्या अनेक कथा प्रचलित आहेत. हा चतुर पक्षी घरटे बिरटे बांधण्याच्या भानगडीत मात्र पडत नाही. खुशाल मोकळेपणाने झाडावरच राहातो. मैना म्हणजे पोपटीण-बाई मात्र झाडाच्या ढोलीत किंवा आडोशाला कुठेतरी फटीत अंडी घालतात. ती पांढरीशुभ्र आणि दरवेळी पाच-सहा तरी असता-तच. घर न करणे हे पोपटाच्या आळसाचे, विरक्तीचे की मुक्त-स्वातंत्र्यप्रेमाचे लक्षण आहे, कुणास ठाऊक !

# मोर

मोर पाहायच्या आधीच मला त्याचे पंख पाहायला मिळाले होते. आमच्या घरी उन्हाळ्याच्या दिवसात वारा घेण्यासाठी मोरपिसांचा एक पंखाच होता! हिरव्या-निळसर फिरत्या रंगांचे ते तलम पीस आम्ही लहान मुले डोळ्यांवरून अलगद फिरवत असू. बालबोध पुस्तकात ठेवून त्याला कुंकू चारीत असू. एक-दोन दिवसांनी बाहेर काढून, पालथी बोटे त्याच्यावर फिरवून ते जिवंत आहे की नाही पाहत असू! पुस्तकात जिवंत राहिल्याने भरपूर विद्या प्राप्त होते अशी आमची तेव्हा श्रद्धा होती. कारण विद्येची देवता सरस्वती हिचे वाहन मोरच नाही का?

वरी आठवण झाली. 'दान पावलं संभू द्येवाला' म्हणत नाचत-नाचत येणाऱ्या 'वासुदेवा'च्या शिखरासारख्या उंच टोपीलाही मोरपिसे असायची. पण सबंध मोर प्रथम पाहिला तो रवीवर्म्याने काढलेल्या सरस्वतीच्या चित्रात. देवघरावरच्या भिंतीवर त्या सुबक चित्राची तसबीर टांगलेली होती. सरस्वतीबरोबरच मोराच्या डोक्यावरही आमचे तात्या पूजेच्या वेळी गंध-अक्षता लावायचे. ते पाहून पाहून माझ्या मनी-मानसी मोराबद्दल आपोआपच एकप्रकारचा आदरभाव उत्पन्न झाला होता. प्रत्यक्ष मोर मी पुढे पुष्कळ दिवसांनी पाहिला आणि आदराबरोबरच त्याच्या देखण्या रूपानेही मला भुरळ घातली. आता या भावनेला मानबिन्दूचीही प्रतिष्ठा लाभलेली आहे. कारण मोर हा आपला 'राष्ट्रीय पक्षी' बनला आहे.

एवढा सन्मान व्हावा अशीच मोराची सुंदर, आकर्षक आणि डौलदार आकृती आहे. मोराइतका शोभिवंत पक्षी दुसरा क्वचितच असेल. हिरव्यागार अंगावर निळ्या-पिवळ्या रंगाच्या छटा विलक्षण मोहक दिसतात. मोराच्या पोटाचा भाग हिरव्या रंगाचा असला तरी मान, गळा आणि माथा निळ्या रंगाचा असतो. त्यावर हिरव्या–पिवळ्या रंगांच्या छटा उमटून दिसतात. मोराची सुरईदार मान, शिरावरचा बादशाही हिरवा-पिवळसर तुरा, विविध रंगी शरीर, रंगीबेरंगी पिसारा, डौलदार चाल चित्त-वेधक असते. पण मोराचा पिसारा हेच त्याचे खरे आकर्षण. किती शोभिवंत ! विविध रंगांमुळे मोराला 'रेनबो वर्ड' असे म्हणतात.

शरीराच्या मानाने पिसाऱ्याचा पसारा थोडा अधिकच.



लांबलचक आणि भरगच्च, पण शोभिवंतच हं ! कारण एवढी लांबसडक पिसे असूनही मोराला काही फार उंच उडता येत नाही! थोडकेच उडतो आणि जमिनीवरच मोठ्या तोऱ्याने चालतो. पिसाऱ्याचा पंखा मोराला हवा तेव्हा मिटताउघडता येतो, जेव्हा तो आपला पिसारा उघडून मागे उभारतो त्या वेळी त्याच्या रूपसौंदर्याची कळा आणखीनच वाढते. हिरव्या, निळ्या आणि पिवळ्या रंगछटांचा एकेक डोळा एकेका पिसावर असतो. या त्याच्या विशिष्ट रंगसंगतीला ' मोरपंखी ' म्हणूनच ओळखतात !

मोराच्या लावण्याला दृष्ट लागू नये म्हणून किंवा मोरालाच आपल्या रूपाचा गर्व होऊ नये म्हणून देवाने त्याला पाय मात्र अत्यंत कुरुप आणि ओबडधोबड दिले आहेत. त्याची एक लोककथा मोठी मजेशीर आहे. एकदा साळुंकीला जायचे होते लग्नाला. तिने नट्टापट्टा केला आणि आपल्या पायांकडे नजर वळवली. तिला आपले पाय अत्यंत कुरूप, वेडे-विद्रे दिसले. अशा पायाने कसे जायचे लग्नाला ? मग ती मोराकडे गेली. म्हणाली, " मोरभाऊ, मी लग्नाला चालल्येय. थोडे तुझे पाय दे की उसने! " मोर भोळाभाळा ! साळुंकीला आपले सुंदर पाय दिले आणि तिचे कुरूप पाय घेतले. पण साळुंकी मोराचे पाय घेऊन जी एकदा गेली ती परत आलीच नाही ! बिचारा मोर ! हळहळत बसला! काय करणार ? आभाळात ढग जमले म्हणजे त्याच्या आनंदाला भरते येते. पिसाऱ्याचा पंखा उभारतो. नि ' थुई थुई थुई ' नाचू लागतो. देहभान विसरून जातो. नाचतो, नाचतो आणि दमून-भागून जेव्हा थांबतो तेव्हा आपल्या कुरूप पायांकडे बघून घळघळा रडू लागतो !

मोराला आपल्या सौंदर्याची जाणीव आहे. म्हणूनच जेव्हा त्याचा पिसारा गळून पडतो तेव्हा तो कुठेतरी आडरानात दडून बसतो. चारचौघांपुढे यायची त्याला लाज वाटते. नवा पिसारा फुटतो तेव्हाच तो सगळीकडे हिंडू–फिरु लागतो.

मोराची मोरणीदेखील कुरूपच असते. आपण तिला लांडोरी म्हणतो. तिला ना रूप, ना पिसारा! मोर नाचू लागला की, ती त्याच्या चोहोबाजूंनी पिंगा घालत हिंडते. मोराच्या नाचण्यावर लुब्ध होऊन माणसांनीही 'मयूरनृत्य' अचलले आहे. कुणी या नृत्याला 'फॅन डान्स' असेही म्हणतात.

या सुंदर पक्ष्याचा आवाज मात्र कर्कश आहे. 'माऊ-माऊ-माऊ' अशा तारस्वरात तो ओरडतो. त्याच्या ओरडण्याला केका म्हणतात. अिंग्रजीत मोराला 'पीकॉक' म्हणतात. ते त्याच्या 'पीहीओ-पीहीओ' अशा आर्त केकांवरूनच. पंडित कवी मोरोपंत यांनी स्वतःला मयूरपक्षी कल्पून ईश्वरास मारलेल्या हाकांना 'केकावली' म्हटले आहे. त्यांचे हे केकावली काव्य प्रसिद्ध आहे.

मोर हा शुभ पक्षी मानला जातो. कोंबड्याप्रमाणेच तो जमिनीवर राहणारा, पण वेगाने धावणारा पक्षी आहे. त्याला उड्डाण मारता येत नाही. पण भरारी घेऊन झाडाच्या फांदीवर वा घराच्या कौलांवर तो जाऊन बसू शकतो. मोरणी आपल्या पिलांसाठी गवताचे घरटे बांधते आणि ते जमिनीवरच झाडा-झुडुपांच्या वळचणीला असते. जून ते ऑक्टोबरच्या दरम्यान ती दहा ते पंचवीस अंडी घालते. लहान पिलांतून नर-मादी चटकन् ओळखता येत नाहीत. एक वर्षानंतर नराला पिसारा फुटतो.

मोर हा तसा माणसाळलेला पक्षी आहे. तो माणसाला


कमी भितो. त्याला आयुष्यही अन्य पक्ष्यांपेक्षा अधिक असते. २० ते २५ वर्षांपर्यंत जगलेले मोर अनेकांनी पाहिलेले आहेत.

मोरातही पांढऱ्याशुभ्र रंगाचे मोर असतात. स्वच्छ नक्षीदार पिसारा अुघडून नाचू लागले म्हणजे हे पांढरे मोरही सुंदर दिसतात. शुभ्र मोर श्रीलंकेमध्ये अधिक आढळतात, तर हिरवेगार मोर जावा बेटात फार दिसतात.

जमिनीतली किडामुंगी, बारीक-सारीक सरपटणारे प्राणी, पाल, सरडा आदी जीवजंतू मोर मटकावतोच; पण वळवळणारा साप दिसला तर झडप घालून तीक्ष्ण चोचीत पकडतो. मानेला हिसडे देऊन सापाला जमिनीवर आपटून घायाळ करतो. दणकट पायाने तडाखे लगावतो नि ठार करतो. साप लहान असला तर सरळ गिळूनच टाकतो.

रानात बिबळ्या वाघांचा आणि कोल्ह्या-लांडग्यांचा ससेमिरा मोराला चुकवावा लागतो. मोराची शिकारही करतात. त्याचे मास रुचकर असते असे म्हणतात. अेकूण मोर हा पक्षी सर्वच दृष्टींनी रुचिपूर्ण असा आहे. म्हणून तर त्याची चाल, त्याचा तोरा, त्याचा नाच आणि त्याचा डौल यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न माणसाने केला. त्याचा रंग आपल्या वस्त्रांना दिला. त्याच्या पिसाने शरीर सजवले आणि आपली सौंदर्याची तहान भागवली. मोर जसा सुंदर व देखणा पक्षी आहे तसाच अत्यंत चतुर, ज्ञानी आणि सावधदेखील आहे. हा गुणवंत पक्षी आपला राष्ट्रीय पक्षी आहे, यातही आपली सौंदर्यदृष्टीच व्यक्त होते.

# कोंबडा



किती माझा कोंबडा ऐटदार
चाल त्याची किती बरे डौलदार
शिरोभागी छानसा तुरा हाले
जणू जास्वंदी फूल उमललेले !

अशी एक कविता लहानपणी बालबोध पुस्तकात होती, ती मला खूप आवडायची. कारण कवितेत वर्णन केल्याप्रमाणे ऐटदार कोंबडे मला शाळेच्या वाटेवर कितीतरी पाहायला मिळायचे.

'क्लक्-क्लक्, क्लक्' असा घुमरा आवाज काढीत जमिनीवरची कीडमुंगी टिपणाऱ्या किंवा जमिनीच्या खळग्यात सगळ्या अंगाचा चेंडू करून बसलेल्या कोंबड्या माझ्या चांगल्या ओळखीच्या होत्या. नेहमी नेहमी पाहून माझा असा समज त्या वेळीच झालेला होता की कोंबडेकाकांच्या मानाने कोंबडीणकाकूच जास्ती कष्टाळू, कामसू व मेहनती असतात. कारण जेव्हा पाहावे तेव्हा आपले कोंबडे-काका आपल्याच डौलात आणि तालात चालताना किंवा घराच्या छपरावर, झाडाच्या फांदीवर, वैरणीच्या ढिगाऱ्यावर डोक्या-वरचा तुरा हालवीत मान लचकवताना दिसायचे. असे करायचा कंटाळाच आला तर लांब घशातून आवाज काढून बांग द्यायचे, 'कुकूऽचकू ऽऽऽ!'

अंगच्या रुबावाला शोभणाराच करडा आवाज! ऐकणाराला कर्कश वाटायचा. दाणे टिपण्यात मग्न असलेल्या कोंबड्या बिचाऱ्या घाबरून जायच्या! त्यांनी घाबरून जावे असेच वागणे आणि ओर-डणे! असाच तोरा आणि ताठा!

"पायी शोभे पांढरीशी विजार
गमे विहगातिल बडा फौजदार!"

असे त्याच कवितेत पुढे कोंबड्याचे कौतुक वर्णिलेले आहे. कोंबडेकाकांची ऐट आणि दरारा पाहून ते खरोखरच पक्ष्यांतले फौजदार असावेत असे मला त्या वेळी प्रामाणिकपणानं वाटू लागले होते. आता मात्र हिरवट-खाकी रंगाच्या टोपीत लालभडक तुरा खोचलेल्या लष्करातल्या जवानासारखे वाटतात.

कोंबडेकाकांचे सगळे कामच भडक! अंगही तसेच डोळ्यात भरण्यासारखे. लालबुंद तुरा, पांढरी कवरी मान, निळसर हिरव्या

झाकेचे पंख, आणि दणकट पाय, पोट गुवगुबीत, बोटे सडक, भेदक पाणीदार डोळे आणि आखूड पण तीक्ष्ण चोच. चोचीच्या खाली गल-मिशांसारखे दोन लोंबते लाल कल्ले, मानेच्या खालच्या भागावर दोन्ही बाजूंस एकेक लाल रंगाची झुलती गलोली– पडद्यासारखी शोभणारी. एकूण चेहऱ्याकडे तांबड्या रंगाची उधळण वरीच ! तांबडे फुटण्याआधी कोंबडेकाका आरवत असतात. त्याचा या तांबड्या रंगाशी तर काही संबंध नसेल ना ? काही कोंबडे मात्र धुवट, शुभ्र असतात. पांढरा गणवेष चढवल्यासारखे.

पंखाची पिसे, रागावलेल्या मांजरीने शेपटी फिस्कारावी तशी सदा उभी. त्यांची टोके मात्र खाली वळणदारपणाने झुकलेली. पिसे वरीच, पण उंच उडायच्या दृष्टीने मात्र कुचकामाची ! कोंबडे-काका पंख फडफडवीत उडतील; पण किती ? फार फार तर पंधरा-वीस फूट ! बस्. तसा हा मोराप्रमाणेच जमिनीवर वावरणारा.

कोंबडीकाकू मात्र साध्यासुध्या आहेत. त्यांना ना माथ्यावर तुरा, ना चोचीखाली गलोली, की नाही झुपकेवाज शेपटी. आका-रही लहान आणि सदा खाली मान. काही तरी निवडणे, टिपणे चाललेले. पण चिमणीसारखी वटवट मात्र सारखी सुरू. आप-ल्यामध्ये कुणी आलेले खपायचे नाही. चारचौघींशी जमवून घ्यायचे नाही. भांडणाचा नुसता कलकलाट ! गप्प बसतील त्या फक्त अंड्यांवरच ! जणू काही आपलं नवं पिल्लू आत झोपलंय, आणि ते आपल्या कलकलाटानं दचकून उठू नये याचीच काळजी त्यांना असावी ! कोंबडीणकाकूंना अंडी घालणं, ती उबवणं, मग लेकरा-बाळांची देखभाल करणं, त्यांना पोसणं, राखणं अशी बरीच

प्रापंचिक कामं करावी लागतात. त्या एक वर्षाच्या होतात न होतात तोच अंडी घालू लागतात. दहा-पंधरा दिवस हा कार्य-क्रम चालतो. दररोज एक प्रमाणे दहा-पंधरा अंडी घालतात. मग पुढचे खुडुक दिवस ती उववण्यात जातात. वीस दिवसांनंतर अंड्यातून बारीक केसाळ,लव अंगावर असलेले, पिवळसर रंगाचे, मुठीएवढ्या आकाराचे पिलू बाहेर पडते. मांजर, घार, गिधाड, मुंगूस यांच्या खादाड नजरेपासून पिलांना सांभाळता सांभाळता कोंबडीकाकूंचा जीव मेटाकुटीला येतो.

कुक्कुटपालनाचा व्यवसाय फार पूर्वीपासून लोक करीत आले आहेत. काही हौशी लोक कोंबड्यांच्या झुंजी लावतात; तर जपा-नमध्ये पंचवीस पंचवीस फूट लांब शेपटी वाढवण्याचा उद्योग काही मुर्गीपालक करीत असतात! सर्वत्र आढळणारा आणि सर्वांना आवडणारा कोंबडा हा पक्षी असला तरी 'कोंबडीची लज्जत और' म्हणणारेही पुष्कळच!

# कबूतर

'गुटुर्र गूं–गुटुर्र गूं !' गिर्रेबाज कबूतर घुमायला लागले म्हणजे आपले गुबगुबीत अंग आणखी फुलारून घेते. तुरूतुरू सरपटल्यागत जमिनीवरून चालते, किंवा छपराच्या वळचणीला वसून ऐटीने इकडे-तिकडे पाहाते ! आणि पाहाण्याचा रुबाब तरी किती ! कबूतर आपले लक्ष वेधून घेते, ते या त्याच्या रुबाबदार डौलाने आणि अलवार पांढऱ्याशुभ्र किंवा कबऱ्या रंगाने ! कबुतरे पाळण्याचा षौक माणसाला यामुळेच जडला असावा.

कबूतर मनमोहक खरेच ! भुरा कबरा रंग, मानेवर चमकदार अशी हिरवीनिळी सरी. शेपटीकडे काळसर पिसे, नारिंगी डोळे, गुलाबी छटेचे नाजूक पाय.

पांढऱ्याशुभ्र कबुतरांना शांतीचे प्रतीक मानण्यात येते !

पण याच कबुतराला फार प्राचीन काळी 'यमदूत' समजण्यात येत असे. ऋग्वेदामध्ये एक मंत्र आहे :

देवा : कपोत दूषितो यदिच्छन्
दूतो निर्ऋत्या इदमाजगाम् ।
तस्मा अर्चाम् कृणवाम् निष्कृतिं
शं नो अस्तु द्विपदे शं चतुष्पदे ।।

ऋषी म्हणतो आहे, "देव हो, हा जो कपोत पक्षी कोणीतरी आमच्या घराच्या दिशेने पाठविला आहे, त्यात पाठविणाराचा काहीतरी हेतू आहे. तो अवनतीचा दूत म्हणून इकडे आला आहे. त्याला अनुलक्षून आम्ही देवतांची स्तोत्रे गाऊ आणि त्याच्या अमूल-

त्वाचे निराकरण करू. आमचे आणि पशू इत्यादींचेही कल्याण होवो."

परंतु आता कबूतर शांतीचे प्रतीक आणि प्रेमाचा दूत म्हणून सन्माननीय बनले आहे ! घराच्या दिशेने येणाऱ्या कबुतराला पाहून ऋषीला अमंगलाची, अशुभाची चाहूल लागली तर–

तुझं कबूतर सहजच बसलं माझ्या कौलावर
काळिज माझं उडुनि गेलं तुझिया डौलावर !

अशी कोण्या सजणीची प्रेमविव्हल अवस्था झाली. कालमानानुसार कबुतराविषयी माणसांची भावना व दृष्टी अशी बदललेली दिसते. कालाय तस्मै नमः !

पृथ्वीच्या पाठीवर नांदत असलेल्या धार्मिक कथांमधूनही कबुतरांच्या कथा आहेत. कपोत पक्ष्याचे प्राण वाचविण्यासाठी शिबीराजाने आपले मांस दिल्याची कथा भारतीय पुराणात आहे, तर इस्लाम धर्माचे संस्थापक मुहम्मद पैगंबर यांना अल्लाचा पैगाम कबूतरामार्फतच येत होता. आख्यायिका अशी आहे की, हे कबूतर दाणे टिपता टिपताच ईश्वराचा संदेश मुहम्मदसाहेबांच्या कानात सांगत असे.

ग्रीक पुराणातील सौंदर्याची देवता 'व्हीनस' हिचा कबूतर हा प्रिय पक्षी आहे. डौलदार देखणेपणामुळे या पक्ष्याला चित्रकारीत आणि शिल्पकलेतही सौंदर्याचे प्रतीक म्हणून स्थान लाभलेले आहे.


जुन्यापुराण्या वस्तूंच्या माथ्यावरील कंगोऱ्यामध्ये कबुतराच्या आकृती खोदलेल्या असत. त्यांना 'कपोतपालिका' असे

म्हणत. जीर्ण वास्तूंच्या वरती आजही कुठे कुठे कपोतपालिका दिसतात. या कबुतरांच्या चोचीतून छपराचे पाणी वाहून जाण्याची व्यवस्था केलेली असते.

संदेशवाहनासाठी कबुतरांचा उपयोग फार प्राचीन काळापासून करण्यात येत आहे. शांतीचे आणि प्रेमाचे संदेश पोहोचवणारे हे आकाशगामी पोस्टमन युद्धाच्या काळात हेरगिरीदेखील करू शकतात! शत्रूंच्या हालचालींची बातमी आपल्या गोटात चटकन आणि विनासायास कबुतरांमार्फत पूर्वी पोचविली जाई.

कबुतरांतही पुष्कळ जाती आहेत गिरेंबाज, लक्का, शीराजी, इत्यादी.

शेकडो मैल, नेमक्या स्थळी संदेश देऊन परतण्याचे काम कबुतरे कशी करतात? एक तर त्याचे शिक्षण त्यांना दिलेले असते आणि संदेश नेणारा हा आपल्या मादीच्या ओढीने परत येण्यास आतुर असतो.



कबुतरांचा पोस्टमनसारखा उपयोग करून घेण्याची प्रथा प्रथम पूर्वेकडील देशांत बगदादच्या सुलतानाने सुरू केली. अकबर बादशहाजवळ वीस हजार संदेशवाहक कबुतरे होती म्हणतात.

बल्लाळसेन नावाचा एक राजा बंगालमध्ये होऊन गेला. एकदा राजा युद्धभूमीवर चालला असताना त्याने आपल्याबरोबर एक कबूतर घेतले होते. राजा राणीला म्हणाला, " जर हे कबूतर एकटेच परत राजवाड्यात आले तर मी युद्धात कामी आलो असे समज. "

परंतु काय झाले कुणास ठाऊक, कबूतर एकदा निसटले आणि सरळ राजवाड्यात परतले. राणी दचकली. दुःखी झाली. त्या काळच्या रिवाजाप्रमाणे तिने सती जाण्याची तयारी केली. परंतु तेवढ्यात राजा तिथं पोचला म्हणून तिचे प्राण वाचले. कबुतरांना आपल्या घरट्याकडे परतण्याची ओढ विलक्षण असते.

कबुतरांना विशेष लांब पल्ल्याची दृष्टी आहे. त्यामुळे लांब अंतरावरून किंवा बऱ्याच उंचीवरूनदेखील ते आपले घरटे ओळखू शकते. प्रवास करताना कबुतरांचा वेग ताशी ३५ ते ४० मैल असतो. काही विशिष्ट जातींची कबुतरे तर ताशी ७० ते ७५ मैल वेगानेही जातात. एक मैल उंचीवर कबूतर जाते आणि चार-सहा तास गगनसंचार करू शकते. कबुतरांच्या शर्यती अँटवर्प येथे सुरू झाल्या. एकदा एका कबुतराने १००० मैलांची शर्यत २ तास आणि ५९ मिनिटांत जिंकली अशी आख्यायिका आहे.

आभाळात बहिरीससाणा आणि जमिनीवर मांजर हे कबुतराचे शत्रू !

वेदकाळात 'कपोत' म्हणजे कबूतर या पक्ष्याला आपल्याकडे अशुभ मानले जाई ; पण या पक्ष्याने आपल्या रूपसौंदर्याने आणि कर्तृत्वाने माणसाला भुलवले आहे. म्हणूनच ठिकठिकाणी कबुतरखाने आपण पाहातो !

# कोकिळ

वसंत ऋतू येतो आणि मोहोरलेल्या पानांफुलांच्या गर्द झाडां वरून आवाज येऊ लागतो– 'कुहूऽकुहू ऽ कुहू ऽऽ'. हा विसरलेला आवाज परत ऐकू येताच आपण, आनंदाने कान टवकारतो. मनाशीच म्हणतो, 'अरे, हे नवलाचं पाखरू आलं वाटतं!' निंब-आंबा मोहोरलेला असतो. वडापिंपळावर लाल-पोपटी लव फुटलेली असते. गुल्मोहोर नखशिखान्त फुलून गेलेला असतो आणि हे 'कुहूऽ कुहू ऽ'चं गाणं गाणारं नवलाचं पाखरू खरंच विनचूक परतलेलं असतं.

इतके दिवस कुठं असतं, कुठं राहातं, काय करतं कुणास ठाऊक! पण ज्या अर्थी उन्हाळ्यात परत येतं त्याअर्थी त्याला पाऊस, थंडी, मानवत नसावी. भारताच्या उत्तरभागात जेव्हा थंडी असते तेव्हा हे पाखरू दक्षिण भागातल्या उबदार हवेला जातं नि तिकडे गारठा पडू लागला म्हणजे उत्तरेकडे परततं. बंगालमध्ये मात्र बेताबाताचीच थंडी पडत असल्यामुळं ते तिथं टिकून असतं. हे जसं नवल तसंच आणखी एक आहे. ते म्हणजे, हे पाखरू मुलुखाचं लाजरं-बुजरं आहे! कधी उघड्यावर चारचौघांत यायचं नाही! मोकळ्या-ढाकळ्या फांदीवर दिसायचं नाही. बुरुजावर, शिखरावर बसायचं नाही. घरात अंगणात फिरकायचं नाही. गर्द पानांच्या अडोशाला बसेल. सगळं अंग झाकून घेईल. कुणाच्या दृष्टीस पडायचं नाही. जशी गोषातली कुलवतीच! पण लपून-

छपून राहायचं, एवढं लाजायमुरकायचं तर गपचिप तरी बसायचं, आळी-मिळी गुपचिळी करून ?

अंहं, ते नाही जमायचं ! दडून वसेल नि आवाज टाकेल– 'कुहूऽकुहूऽकुहू!' देवानं रंग दिलाय काळा; पण गोड दिलाय गळा. मग पंचमाची धून दिली लावून म्हणून काय बिघडलं?

ऐकणाराचं काहीच बिघडत नाही. पण ऐकता ऐकता एखाद्यानं जर 'कुहूऽकुहूऽकुहू' करून नक्कल केली तर मात्र काम बिथरतं आणि उलट सादाला प्रतिसाद द्यावा तशा रीतीनं हट्टाला पेटून म्हणा किंवा चिडून जाऊन म्हणा ते जास्तीच चढ्या सुरात, जलद गतीनं 'कुहू-कुहू' करू लागतं. एक शर्यतच लागते ! ही गती इतकी द्रुत असते की नक्कल करणाराच हरतो आणि पानाआडचं पाखरू जिंकतं !

पाखरू जिद्दीचं खरं; पण केवढं असतं म्हणाल, तर चुकूनमाकून दिसलं तर दिसेल आणि कळेल की असतं लहानशा कावळ्याएवढं. तसंच काळं. आखूड चोचीचं नि लांबसर शेपटीचं, काळ्या पिसांचं. रंगरूपानं जरी कावळ्याशी साम्य दिसलं तरी आवाज मधुर आणि स्वभाव शालीन. भित्रा म्हणा हवा तर ! पण कावळ्याची धिटुकली निर्लज्जता नाही, तशीच कर्कश्श 'काऽव काऽव' ही नाही. कावळ्याच्या ओरडण्यानं डोकं उठतं पण कोकिळेचा आवाज ऐकावासा वाटतो.

'कागा, का सो लेत है, कोयल काको देत। इक बानी के कारने, जग अपना कर लेत।' याचा अर्थ असा की, कावळा कुणाकडून काय घेतो आणि कोकिळ तरी कुणाला काय देतो ? परंतु आपल्या मधुर स्वराने तो जग आपलेसे करून घेतो ! पण

किंचित भुरकट अंगाच्या, हिरवट चोचीच्या आणि तांबूस डोळ्यांच्या कोकिळाबाई मात्र दिसतात तेवढ्या साध्याभोळ्या मुळीच नसतात ! उलट 'खाली मुंडी नि पाताळ धुंडी' अशा ढालगज जातीच्या असतात! कोकिळरावांना घरटं बांधायला नको असतं. मग त्या तरी काय करणार ? सरळ आपल्या कावळ्याच्या घरट्यात शिरतात. कावळीणकाकूंची काही अंडी पळवतात आणि तेवढीच आपली ठेवून देतात. रंगारूपानं ती तशीच असतात. एवढं करायला मात्र कोकिळराव त्यांना मदत करतात ह. ते काय करतात? आपली अंडी राखत बसलेल्या कावळेकाकांना हुलकावणी दाखवून घरट्यातून वाहेर काढतात. उडत उडत दूर नेतात. तेवढ्यात कोकिळाबाई हा उद्योग करून मोकळ्या होतात ! कावळेकाकूंनी धूर्तपणाची किती जरी ऐट आणली तरी इथं मात्र फसतात! आपल्या अंड्यांबरोबरच कोकिळाबाईंची अंडीही उबवीत बसतात. बरं, पिलं बाहेर आल्यावर तरी ओळखावीत ! तेवढंही शहाणपण नसतं. त्या पिलांना पाळतात, पोसतात आणि वाढवतातही. पिलंही बेटी वस्ताद ! पंखांत बळ येईतो तिथंच राहातात, तशीच बोलतात आणि नंतर घरटं सोडून गेल्यावर मात्र 'कुहू ऽ कुहू' करायला लागतात !

पक्ष्यांत गाणारा पक्षी म्हणजे कोकिळ असं मानलं जातं. कोकिळेची कूक मिठ्ठास असते. म्हणूनच गोड गळ्याच्या गायिकेला 'कोकिळकंठी' म्हणतात. 'कू' आणि 'सू' या बहिणींच्या आवाजावरून 'कुऊ ऽऽ कुऊ ऽऽ' हा शब्द आला अशी एक मजेशीर लोककथा आहे : एक होती कू आणि एक होती सू. दोघी बहिणी एकमेकींवर भारी प्रेम करायच्या. एकदा उडत उडत जंगलात गेल्या. या झाडावर सू बसायची, त्या झाडावर कू बसायची. मग एकमे-


कींना हाक मारायच्या, "कुऊ ऽऽ"

"सूऊ ऽऽ"

एकदा काय झालं, एका वाघानं कूला पाहिलं. त्यानं झाडाखाली जाऊन मोठ्यानं डरकाळी फोडली. तशी कू घाबरून पटकन् खाली पडली नी मेली! पण हे सूला काही अद्याप कळलेलं नाही. ती वेडी कातरस्वराने अजूनही हाक मारत असते–

"कुऊ ऽ कुऊ ऽऽ!"

# बुलबुल



भारताची प्रकृती सर्वसमावेशक आहे. नाना धर्म, नाना पंथ, रीती-रिवाज, संस्कृती, लोक, वेष, भाषा कितीतरी गोष्टी अन्य देशांमधून भारतात आल्या, राहिल्या, वाढल्या, आणि इथल्याच झाल्या. भारतीयच बनल्या.

गुलाबाचे फूल आणि बुलबुल पक्षी हे मूळचे इराणचे आहेत असे सांगितले तरी खरे वाटणार नाही, इतके ते भारतीय झाले आहेत. गुलाबाचा ताटवा आमच्याच अंगणातला, तसा मधुर शीळ घालणारा बुलबुलही आमच्याच झाडावरचा.

बुलबुल गवई गाई गान
हरपुन जाई भूक-तहान

गाणाऱ्या पक्ष्यांच्या गटातील बुलबुल हा पक्षी आहे. व्यावसायिक पक्ष्यांच्या भाषेत बोलायचे तर हा 'गवई' पक्षी आहे. आपल्याकडे बुलबुलास 'गवई' म्हणतातच. तर हे गवईबुवा गातात गोड हे ओघानेच आले आणि उत्तम गाणाऱ्या गवयाच्या गाण्याचे मोलही तसेच जबर असणार हे सरळच आहे.

असे सांगतात की बुलबुलांची काबूल शहरात बाजारपेठ आहे. तिथे उत्तमोत्तम गाणाऱ्या गवई बुलबुलांचा बाजार भरतो !

आणि अशा उत्कृष्ट गवई बुलबुलाला पाच-पाचशे सहा-सहाशे रुपये नगदी मोजून धनिक लोक खरेदी करतात! आता या खरेदीविक्रीतली रसिकता जातिवंत किती आणि बाजारी किती हा प्रश्न अलाहिदा. पण बुलबुल हा किमती आणि गुणी पक्षी आहे एवढा बोध आपल्याला पुरेसा आहे. पोपट, काकाकुवा या पक्ष्यांप्रमाणेच बुलबुल पक्षीही शौकीन मंडळी पाळतात. पितळी पिंजरा दाराशी टांगतात. फळफळावळ खाऊ घालतात. त्याचं कोडकौतुक करतात. बुलबुल मधल्या दांडीवर रुबाबात बसतो. आणि लहरीनुसार गात राहतो.

पण बुलबुलाची शीळ ऐकावी त्याच्या मुक्त भरारीच्या वेळीच. त्या शिळेला एक विलक्षण गोडी असते. साखरेत घोळल्यासारखी. मग अशी शीळ सोन्याचा पिंजरा असला तरी काय वंदिवासात आनंद देईल ? मुक्त आभाळ, विपुल सृष्टी आणि मुक्त शीळ! बालकवींनी कोणत्या पक्ष्याला उद्देशून 'आनंदी पक्षी' ही कविता लिहिली आहे कुणास ठाऊक ! पण ते म्हणतात—

"आनंदाचे फिरती वारे।
आनंदाने चित्त ओसरे ॥
आनंदे खेळतो कसा रे। आनंदी पक्षी !
हासवितो लतिकाकुंजांना।
प्रेमे काढी सुंदर ताना ॥
आनंदाच्या गाऊन गाना। आनंदे रमतो !
उंच भराऱ्या मारीत जाणे।
रूप तुझे ते गोजिरवाणे।
गुंगून जाईल चित्त जयाने। दे दे ते गाणे !"

ज्या गाण्याचा ह्व्यास बालकवी धरतात आणि ते मागतात, ते गाणे बुलबुलाचेच असावे असे मला वाटते. पण हा आनंदी पक्षी बालकवी म्हणतात तसा ‘ रूप तुझे ते गोजिरवाणे ’ असा मात्र नाही. पण कवीच्या दृष्टीला तो तसा दिसण्याचा संभव आहेच ! तर बुलबुल आहे चिमणीपेक्षा मोठा, मैनेच्या आकाराचा सात-आठ इंच लांबीचा. पाठ आणि पाठीवरचे पंख असतात मातकट करड्या रंगाचे, पोट आणि गाल असतात पांढरे. त्यावर किंचित तांबूस, किंचित पिवळट छटा दिसते. शेपटीवर करड्या, पांढऱ्या आणि काळसर रंगांच्या लहरी दिसतात. डोके, तोंड आणि चोच मात्र काळी असते. त्यातही मधूनच निळसर झाक दिसते. चोच फार मोठी नाही, फार लहानही नाही अशी, पण तीक्ष्ण असते. डोळे काळे पाणीदार, आणि पाय करडे, काटक. पुढे दोन नी मागे एक अशी तीन सडक बोटे. त्यामुळे फांदीवर, दांडीवर छान बसता येते. पण बुलबुल भक्ष वेधतो तो डोक्यावरच्या कुंचीमुळे ! केसाळ काळी कुंची, फरची टोपी घातलेल्या खाँसाहेबाप्रमाणे याही गवई-बुवांना निसर्गाने दिलेली आहे. काही बुलबुलांच्या माथ्यावर चक्क शेंडी दिसते ! बुलबुलातही प्रकार आहेत. जसे कुंचीवाले, शेंडीवाले तसेच तांबड्या गालाचे, तांबूस पिसांचे, हिरव्या वर्णाचे. ‘ शिपाई ’, ‘ पहारी ’ बुलबुल, गुल्दुम किंवा ‘ हारेवा ’ अशी भिन्न नावेही आहेत.

बुलबुल राहतो रानात. घरटे बांधतो झाडावर. घरटे असते पेलेदार आकाराचे, गवताचे. मात्र हा पक्षी स्वच्छतेचा भोक्ता असावा. एका पक्षी-प्रेमिकाने याच्यासंबंधी गमतीची हकिकत लिहिली आहे. तो म्हणतो. “ एकदा आमच्या ओटीवर एका बुल-

बुलाच्या जोडीने घरटे बांधले आणि त्यात दोन अंडीही घातली. ज्या वेळी अंडी फुटून पिले बाहेर आली त्या वेळी आपल्या चोचीत धरून अंड्याची टरफले बाहेर टाकून देताना मी पक्षिणीला पाहिले. या कामासाठी ती कित्येक वेळा बाहेर गेली आणि पुन्हा आत आली. पण जोपर्यंत घरट्यातील टरफलांचे सर्व तुकडे बाहेर टाकले गेले नाहीत तोपर्यंत ती स्वस्थ बसली नाही, किंवा पिलां-कडेही तिने पाहिले नाही. किंबहुना अंड्याच्या टरफलाचा एखादा-देखील तुकडा व्हरांड्यात पडू नये याबद्दल तिने फार खबरदारी घेतली. घरट्यापासून तिला ती टरफले टाकायला बरेच दूर जावे लागत होते. पण त्या कामात तिने आळस केला नाही.''

बुलबुल पक्ष्यांत नरच गातो. पण गवईबुवा छंदीफंदी स्वभा-वाचे नाहीत. मादीवर प्रेम फार. पिलांवर माया भारी.

मादी उन्हाळ्या-पावसाळ्याच्या सुमारास तांबूस रंगाची तीन-चार अंडी घालते. दोघे मिळून ती उबवतात, राखतात. तसा हा पक्षी भित्रा, लाजाळू आहे, पण माणसाळू शकतो. क्वचित् काही बुलबुल गावानजीक राहतात. माणसांच्या घरात शिरतात; चिम-णीप्रमाणे दाणेदुणे, अन्नाचे कण, किडामुंगी टिपून मटकावतात. कश्मीरमधल्या 'तरत्या घरां'वर-हाउसबोटींवर-बुलबुलांची सारखी चक्कर असते. सर्वांना भुरळ पडावी अशीच बुलबुलाची शीळ असते !

# खंड्या



खेडेगावात नदीकाठावर किंवा ओढ्यानाल्यावर चिंचाबोरींची झाडे झोडपत खुशालचेंडू पोरांचा घोळका हिंडताना अधून-मधून आढळतो. बिनभिंतीच्या शाळेत ही पोरं अक्षराशिवाय पुष्कळ शिकत असतात. लहानवयात ती भली हुमणदांडगी बनलेली असतात. सफाईने झाडांवर चढतात, चपळाईने पाण्यात सूर मारून तळ गाठतात. मोहोळाची पोळी फस्त करतात. शिकारी कुत्र्यांना घेऊन रानेवने धुंडाळतात. झाडाझाडांची नि फुलाफुलांची माहिती त्यांना असते. उडते पाखरू त्यांना ओळखता येते.

पाण्याच्या कडेकडेने हिंडताना, नाना चाळे करत असतानाच ही पोरे तोंडाने एका विशिष्ट ढबीने व गतीने एक हाळी घालत असतात–

" खंड्या, खंड्या, खंड्या, खंड्या ऽ ऽ ऽ
खंड्या, खंड्या, खंड्या, खंड्या ऽ ऽ ऽ "

खंड्या असतो पाण्याकाठच्या झाडाझुडपांवर शांतपणाने वसलेला. एक नाही, दोन नाही. पाहाणाराला वाटावं की खंड्या

गाढ झोपीच गेलाय बरं का! पण हे खंड्याचे ढोंग असते. या बाबतीत तो बगळेकाकांचाच चेला शोभतो.

खंड्या असतो लहानग्या चिमणीएवढाच मूठभर. पण दिसायला मात्र देखणा. पाठ आणि पंख निळे-निळे छान. त्यावर किंचित हिरवी झाक. नारिंगी वर्णाचे पोट आणि पाय मात्र लाल चुटुक. माणसासारखे डोके काळे आणि चोचदेखील काळीकाळीच. पण गाल गोरे गोरे पांढरे. असे हे पंचरंगी पाखरू पाहाणाराचे लक्ष वेधून न घेईल तरच नवल!

म्हणून तर हुंदडणारी पोरे ते दृष्टीस पडताच ओरडू लागतात-- "खंड्या, खंड्या, खंड्या, खंड्या ऽ ऽ ऽ"

खंड्या देखणा असला तरी खोटारडा आहे. पाण्याजवळ स्वारीची वस्ती का? तर कडेच्या फांदीवर किंवा खडकावर निमूटपणाने बसून पाण्यात चुळबुळणारे मासे पटकन् पकडता येतात! तिरक्या चालीनं चालणारे खेकडे मटकावता येतात! पाणकिड्यांचा आरामाने फराळ करता येतो!

पण बगळ्याप्रमाणे स्वारी पाण्यात नाही उतरत. उतरत नाही म्हणजे उतरताच येत नाही. कारण शरीर, पंख, शेपूट जशी लहानखुरी तसे पायही तोकडेच. बगळ्याच्या तंगड्या कशा उंच असतात. खंड्याचे पाय अगदीच आखूड. या पायांनी त्याला धडचालताही येत नाही की शत्रूशी लढताही येत नाही. झाडांची फांदी मात्र लहानग्या बोटांनी घट्ट पकडून बसता येते.

पण पाय आणि शरीर तोकडे असले तरी चोच मात्र त्या मानाने पल्लेदार लांब आणि सांडशीसारखी सरळ. पाण्यातले जिवाणू वेचून टिपता येतील अशी टोकदार. खंड्या गुपचूप बसतो आणि पाण्यात थोडीशी जरी चुळबुळ झाली तरी पटकन उडून

सूर मारतो आणि चोचीच्या सांडशीत पिटकुला मासा धरून आणतो! कधीकधी नदी-नाल्याच्या प्रवाहावर खंडेराव आपल्या भक्ष्यासाठी इकडून तिकडे आणि तिकडून इकडे असे घुटमळता-नाही आढळतात.

मासे धरण्यात खंडेरावांचा हात कुणीच धरत नसावा. त्यांच्या या कलेत ते बिनतोड ठरलेले असल्यामुळेच कदाचित त्यांना इंग्रजी माणसांनी ‘ किंग फिशर ’ ही पदवी बहाल केलेली असावी.

आपल्याकडेही धंद्यावरून पक्ष्यांची नावे ठेवण्याच्या पद्धती-नुसार खंडेरावांना ‘ धीवर ’ असे म्हणतात. धीवर म्हणजे मच्छी मारणारे कोळी. ते समुद्रावर किंवा नदीप्रवाहावरच राहातात. आणि माशांची शेती करतात. पक्ष्यांतही खंडेरावांसारखे धीवर आहेत. त्यांना धीवर म्हटलेले मी समजू शकतो, पण ‘ गण्या ’ का म्हणतात हे मात्र माझ्या लक्षात आलेले नाही. कुठे कुठे पोरे ‘ गण्या, गण्या, गण्या ’ असेही म्हणताना ऐकले आहे. कदाचित कुणी तरी, कधी तरी लाडानं ठेवलेलं ‘ गण्या ’ हे नाव असावं. असं पुष्कळदा होतं. खरं नाव असतं सौदामिनी, पण म्हटलं जातं बेबी! तसंच हे.

खंड्या तीक्ष्ण स्वरात ‘चिची-चिची’ असा ओरडतो. ‘ क्लिक, क्लिक ’ करून गाणे गातो. हो, हो, खंड्या गाणे गातो. पण त्याचा आवाज तुम्हाआम्हाला आवडत नाही याला त्याचा काय बरे दोष? परंतु तुम्हाला आवडो न आवडो, खंड्या आपल्या मना-प्रमाणे हवे तसे गाणार! तुम्ही काही म्हणा. म्हणा कशाला, ऑस्ट्रेलियात का कुठे तरी त्याच्या ह्या हास्यास्पद गाण्यावरून

त्याला 'लाफिंग अॅस', म्हणजे 'हसणारा गाढव' म्हणतातच म्हणे !

खंड्याची खंडीण मार्च ते जून या मोसमात पांढरी चकचकीत ६–७ अंडी घालते. नवरा–बायको बाहेर लबाडी करत असले तरी घरात एकमेकांवर विश्वासून राहतात. मिळून अंडी उबवतात. पिलांना पाळतात, पोसतात.

दोघेही घरटे बांधण्याच्या भानगडीत पडत नाहीत. पाण्या-जवळ जमिनीतच आडवा फूट-दोन फूट लांबीचा लहानसा बोगदा चोचीने खणून तयार करतात. त्यातच सुखाने प्रपंच थाटतात.

खंड्याला त्याच्या जमातीचे बरेच भाऊबंद आहेत. कुणी काळ्या-तांबड्या रंगाचे, तर कुणी पांढऱ्या-करड्या रंगाचे, कुणाचे डोके तपकिरी रंगाचे तर कुणाची चोच लाल भडक. देशोदेशी खंड्या आढळतो.

# सातभाई

एक नाही, दोन नाही. एकूण आहेत सातभाई. केव्हाही पहा, कुठेही पहा, मिळून मिसळून सात रहा. अशी ही नवलाईची पाखरं. खाता-पिताना, बसता-उठताना, जाता-येताना, खेळता-झोपताना हे आपले सातच्या सात ! आणि केवळ अशा सुखा-समाधानात किंवा कामधंद्यात नव्हे, तर भांडण-तंटयातही हे आपले सातच्या सात !

सातभाई भांडतात ? हो, खूप भांडतात. पुष्कळ भांडतात. त्यांतील बाया तर भारी वटवट करतात. एकमेकींवर तुटून पडतात, चिडतात, ओरडतात. एकमेकींनी एकमेकींच्या झिज्या उपटाव्यात तशी पिसे उपटतात. चोचींचे प्रहार करतात.

पण हे सातांचे किंवा सातजणींचे आपल्या सातांतच. त्यांच्या भांडणाचा फायदा घेऊन जर एखादा स्वार्थी, लठ्ठ बोका मध्ये पडून चोंबडेपणा करू पाहील तर सगळ्या सातजणी पटकन वटवट बंद करतील नि बोकोबालाच धडा शिकवतील. सातजण आपसात वाटेल तेवढी भांडतील, तंडतील, पण परका येताच एक होतील. 'आम्ही आहो सात' असे त्याला धर्मराजाच्या निर्धाराने ठणकावून सांगतील. कौरव-पांडव आपसात भांडतील, पण गंधर्वासारख्या परक्यांविरुद्ध 'आम्ही एकशे पाच' म्हणून लढतील, असेच धर्मराज नव्हते का म्हणाले ?

तर हे सातभाईंचे असे आहे. आपण यांना सातभाई म्हणतो, इंग्रज लोक 'सेव्हन सिस्टर्स' म्हणतात !

भाई म्हणा, बहिणी म्हणा, सातांचा कळप असतो हे त्यांचे वैशिष्टच !

साळुंकीएवढ्या आकाराचे एकेक पाखरू असते. मळकट मातकट रंगाचे, ओबडधोबड दिसणारे. डोळे पांढरे बटबटीत. चोच पिवळट छटा असलेली पांढुरकी, आणि पायदेखील तसेच फताडे. शेपटी शरीराच्या मानाने लांबट, पण अितकी ढिली, इतकी सैल की वाटावे, ती नुसती कुणी त्याच्या शरीरात खुपसून वा चिकटवूनच ठेवलेली आहे !

सातभाईची शेपटी नि पंख नावापुरतेच असतात. कारण पंखांनी त्याला नीट उडता देखील येत नाही, अितके ते कमकुवत असतात. म्हणून सातभाई फारसा कुठे उंच उडतच नाही. पक्षी असूनसुद्धा त्याला उडणे जमत नाही आणि शोभतही नाही !


मग सातजण, सातभाई किंवा बहिणी करतात काय ? तर सबंध दिवसभर जमिनीवर चिमणीसारखं टुणटुण उड्या मारत हिंडत राहतात. पालापाचोळ्यातील, दलदलीच्या जागेतील कीडमुंगी टिपत असतात. झुरळे, कोळी, कृमी-कीटक, दाणे, फुलातील पराग इत्यादी वेचत फिरतात, पोट भरतात. आपल्या पिलांना भरवतात.

सात बहिणी मनास येईल तेव्हा अंडी घालतात. त्यांना नियम, धरबंद नाही. ती सामान्यपणे दर वेळी तीन चार तरी असतातच. अंडी दिसायला निळसर असतात. नर-मादी दोघेही आळीपाळीने अंडी उबवतात.

सातभाई एकत्र मिळून मिसळून राहतात खरे, पण पावशीण त्या सर्वांनाही चकवण्याइतकी वस्ताद असते. कोकिळेला तिने गुरू केले की हिची युक्ती तिने उचलली कुणास ठाऊक ! पण घडते

असे की, पावशीण आपले अंडे केव्हा तरी सातजणांची नजर चुकवून सातभाईंच्या घरट्यातच शिरून घालते. सातभाई कावळ्यांचेच भाईबंद.! आपल्या अंड्यांबरोबर पावशिणीचेही अंडे उबवत असतात ! पिलू बाहेर आल्यावर पाळतात, पोसतात. आणि ते बेटं थोडं मोठं झालं की सातभाईंना आणि त्यांच्या पिलांना गुंगारा देऊन पोबारा करतं !

लहानखुऱ्या झाडांच्या गर्दीत अथवा टेकडीच्या पायथ्यावर असलेल्या खुरट्या झुडुपात सातभाई बहुधा राहतात. गवतपाला, काटकीकुटकी जमवून जमवून घरटी बांधतात. घरट्याचा आकार उभ्या पेल्यासारखा असतो. झुडुपाच्या खालीच पण



पासून थोडे वर सातभाई घरट्यासाठी जागा निवडतात. अन्य पक्ष्यांप्रमाणे झाडाच्या उंच फांदीवर किंवा शेंड्याजवळ राहणे त्यांना मानवत नाही किंवा पसंत नाही.

सात घरचे सातजण एकत्र आल्यावर मुकाट्याने थोडेच बसतील ? वडवड करणारच. त्यांच्या सदैव चालणाऱ्या वडबडी-वरूनच त्यांना 'वडवड्या' पक्षी असेही म्हणतात.

कळप करून राहण्याची प्रेरणा पशुपक्ष्यांत संरक्षणाच्या भावनेतून आलेली असते. तशीच ती सातभाईंतही आहे. शिकारी पक्ष्यांपासून संरक्षण करण्यासाठीच ते गटाने राहतात. वडबडीचे पर्यवसान भांडणात होत असले, तरी त्या कलकलाटाने त्यांच्या गटात एक प्रकारची जागरूकता जाणवते. आणि तीही त्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने उपयोगीच पडते. कारण शिकारी पक्षीदेखील मग, ते गाफील नाहीत असे समजून दूरच राहतात. वडवडीचा फायदा तो असा !

# सुतार

‘ टोक्-टोक्-टोक् टोक्-टोक्-टोक्.. ’

सुतार पक्ष्याचे काम सुरू असते.धारदार निमुळती चोच झाडाच्या बुंध्यावर हातोडीगत घाव घालत असते; ‘ टोक्-टोक्-टोक् ’ आवाज येत राहतो. डोके उठवणारा. अस्वस्थ करणारा. चीड आणणारा. पण सुतारमेटावर जशी करवत चालते, तशी झाडावर चोच चालते. हलके हलके झाडाच्या सालीच्या ढलप्या सुटू लागतात. गळून पडतात. सुतार न दमता, न थकता घाव घालत राहतो ‘ टोक्-टोक्–टोक्.. ’ सालीचे पापुद्रे एकामागून एक सुटतात. आणि हळूहळू झाडाच्या बुंध्यावर लहानग्या ढोलीसारखे बीळ तयार होते. बस्, काम थांबले. सुताराचे घर तयार झाले !

सुतारीणबाईंचे अंडी घालायचे दिवस जवळजवळ येऊ लागले की सुतारदादा चोचीची पाचरी परजून तयार होतात. जबडयाची पटाशी आणि जिभेचा रंधा फिरू लागतो, आणि घरटे तयार होते.

घरटे चांगले भक्कम असते. लाकडी कडीपाटाचा वाडा असावा तसे. सुतारीणबाईंना ते कित्येक दिवस आसरा देतेच देते, पण त्यांच्या पोराबाळांना आणि लेकी-सुनांनाही म्हणे तिथेच सुरक्षितता लाभते !

मार्च ते ऑगस्ट ह्या काळात सुतारीणबाई तीन पांढरी चक-

चकीत अंडी घालतात. सुतारदादा नुसते घर बांधून मोकळे होत नाहीत, तर सुतारीणबाईंना अंडी उबवायला, भक्ष्य शोधायला मदतही करतात.


पण काही सुतार मंडळी अशीही असतात, की मुलाबाळांकडे अजिबात लक्ष देत नाहीत. सुतारीण बिचारी हिंड हिंड हिंडते, किडूक-मिडूक आणते. लेकरांना भरवते. कधीकधी या धांदलीत तिला घरट्यात परतायला उशीर होतो. मग लेकरे भुकेने ओर-डायला लागतात. रडायला लागतात. गोंधळ माजवतात; पण सुतार जागचा हालत नाही, बोलत नाही, बसली जागा सोडत नाही. दाढेला तंबाखूची गोळी धरल्यागत गप्प बसून सगळी मज्जा पहात बसतो.

पण असे आळशी प्रत्येक जमातीत असायचेच. एकूण सुतार चांगले, प्रेमळ, वत्सल असतात.

जसे स्वभावाने चांगले, रीतीभातीने चांगले, तसेच दिसाय-लाही सुतार देखणे असतात.

सुताराची पाठ पिवळट सोनेरी असते. माथ्यावर किरमिजी रंगाचा तुरा असतो. शेपटी काळी कुळकुळीत असते. पोट आणि मान पांढुरक्या रंगाची असते. पुढेमागे दोन-दोन बोटे असलेले करडे पाय मात्र वळकट असतात. या पायांच्या आधारानेच सुतार झाडां-च्या सालीवर नख्या रुतवून लाकूड तासायला बसतो. खिळा ठोकून बसवल्यासारखा खोडाला समांतर. तो उभाच्या उभा घट्ट राहून काम करतो.

कठीण लाकडाचा भुगा करणे हा सुताराच्या हातचा नव्हे चोचीचा मळ आहे. पण काळे सुतार शहाणे असतात म्हणा, किंवा



श्रम करणारे असतात म्हणा. पण तसे असतात खरे. असे सुतार काय करतात, तर झाडाच्या खोडावर आधीच जर मुंग्यांनी टोकरून टोकरून बीळ केलेले असेल तर तीच जागा पसंत करतात, आणि मुंग्यांनीच पोखरलेली जागा आपल्याला हवी तशी ऐसपैस पोखरून कातरून घेतात. सरळ बिस्तरा लावून टाकतात !

बिचाऱ्या मुंग्या ! एरवी चवताळून हल्लेखोरांना कडकडून डसतात. तशा सुतारावरही तुटून पडतात. त्याच्या पायाला कडकडून डसतात. पण सुताराचे पाय लाकडाहून कडक ! त्यांना काहीसुद्धा इजा होत नाही. मुंग्यांचीच शिरे तुटून गळून पडतात ! सुतारांचे आयतेच फावते. बसल्या जागी भक्ष्य मिळते.

लहान-मोठ्या अळ्या, किडे, मुंग्या, मुंग्यांची अंडी हे सुताराचे जेवण. टोकदार चोचीचा आणि लांबसडक जिभेचा अळ्या-किडे पकडायला त्याला हत्यारासारखाच उपयोग होतो.

सुताराची पिले जन्मतात तेव्हा त्यांच्या तोंडावर व माथ्यावर लवदार पिसे असतात. यामुळे त्यांची तोंडेही नीट दिसत नाहीत. हळूहळू ती झडून जातात. माथ्यावर पिसांची कुंची असल्यामुळे घराचे कडी छप्पर उठता--बसता लागले तरी इजा होत नाही.

सुतार हा भारत, पाकिस्तान, श्रीलंका, ब्रम्हदेश या देशांतून विशेषत: आढळतो.

सुताराच्या देखणेपणाला एकच शोभणारी गोष्ट म्हणजे तो रसिक आहे. तो कुटुंबवत्सल आहेच, तसा खिलाडू वृत्तीचाही आहे. घरादारावर त्याचे भारी प्रेम. माणसासारखे. म्हणून तर तो अन्य उनाड पक्ष्यांसारखा सदासर्वदा घराबाहेर राहात नाही रात्रीदेखील घरातच झोपतो. शूत्रूपासून कुटुंबाचे रक्षण करतो. घरातल्या सगळयांनी मिळून आनंद उपभोगावा अशी त्याची उदार व ममताळू वृत्ती आहे. झाडांच्या गर्द हिरव्या पानांत लपून-छपून ‘साई सुटयो ऽ ’चा खेळ खेळण्यात सुतारांचे कुटुंबच्या कुटुंब रंगून गेलेले आढळते.

# बगळा

दादू परीट कपडे धुवायला नेण्यासाठी घरी यायचा. मळक्या कपड्यांचा ढीग त्याच्यापुढे टाकून आमचे काका म्हणायचे, "दादू, कपडे कसे लख्ख पांढरे काढले पाहिजेत बरं का !" पुढ्यातले कपडे मोजून घेता घेता दादू म्हणायचा, "अगदी बगळीच्या पंखागत धुतो जी."

पांढऱ्याशुभ्र रंगाला बगळ्याची उपमा देण्याइतपत बगळा स्वच्छ पांढरा असतो. बगळ्याचा पांढरेपणा पाहून कावळ्यालाही एकदा हेवा वाटला. आणि त्याने नदीवर जाऊन दगडाने आपले काळे कुळकुळीत अंग घासून घासून पांढरे करायला सुरुवात केली. पण कावळ्याचा रंग काही असा तसा कच्चा नव्हता, चांगला पक्का होता. अंगाला जखमा झाल्या नि कावळा मेला, पण बगळ्यासारखा काही पांढरा झाला नाही.

कावळा म्हणे मी काळा पांढराशुभ्र तो बगळा

अशी बगळ्याच्या पांढरेपणाची ख्याती.


बगळ्याचे रूप असे पांढरे-गोरेपान असले तरी त्याचा स्वभाव मात्र तसा नाही. तो मनाने काळा आहे. ढोंगी आहे, लबाड आहे. संथ, उथळ पाण्यात बगळोबा एका तंगडीवर निश्चल उभे राहतात. डोळे झाकून घेतात. जणू एखादा योगी तपसाधनेत दंग आहे. एक नाही, दोन नाही. कसलीच हालचाल नाही. अगदी मख्ख. पाहणाराला वाटावे, किती देखणे आणि शहाणे पाखरू हे !

पाण्यातल्या भोळ्या माशांना आणि खुळ्या बेडकांना तर कळूनही येत नाही की येथे कोणी उभे आहे. त्यांना वाटते, झाडाची फांदी, काटकी असेल. ते विश्वासाने सुरसुर करत जवळ जातात आणि बिचारे बगळ्याच्या ढोंगाला बळी पडतात. बगळोबा या भोळ्या खुळ्या जीवांना पायाजवळ येऊ देतात आणि पट्कन लांबड्या चोचीने पकडून चट्टामट्टा करतात. पुन्हा आपले तसेच ध्यान! या फसव्या ध्यानालाच माणसे म्हणतात—बकध्यान! एखादा माणूस वरकरणी गोरागोमटा, गोड बोलणारा, सज्जन वाटला आणि अंतःकरणाने जर तो खुनशी व घातकी असला तर अशा माणसाला 'बगळा' म्हणतात. म्हणजे बगळ्याच्या पांढऱ्या रंगाबरोबरच त्याचा ढोंगी, कपटीपणाही प्रसिद्ध आहे. बगळा पाण्यात उभा असतो. तरी तो खास पाण्यातला पक्षी नव्हे. नदी-नाल्याच्या काठाकाठाने किंवा उथळ तळी, डबकी यांच्या जवळपास तो वावरत असतो. कारण किडुक मिडुक,कीटाणू, खेकडे,छोटे छोटे मासे आणि बेडक्यांचा आहार त्याला सहज सुलभतेने मिळतो.

खोल पाण्यात बगळा जात नाही. एक तर त्याच्या तंगड्या उंच, काटकुळ्या असतात आणि दुसरे म्हणजे त्याची बोटे सरळ, सुटी व सडक असतात. त्यांच्यात पडदा नसतो.

सर्वसाधारणपणे बगळा पांढरा असला तरी ह्यांच्यातही मातकट, हिरवट रंगाचे काही बगळे असतात. मातकट रंगाच्या बगळ्यांनी पंख पसरले म्हणजे उडताना ते पांढरेच दिसतात. त्यांच्या पंखाची पिसे पांढरी असतात. त्यांच्या खाली एक पिवळट रेघ दिसते. तशीच गळा व छातीवरच्या पांढऱ्या रंगावर एक

पिंगट रंगाची छटाही दिसते. चोच कट्यारीसारखी लांबसडक आणि धारदार असते. ती टोकाला निळी, पिवळसर आणि शेवटाला काळी दिसते. गाय, बैल, म्हैस व घोडा यांच्या भोवतीभोवतीदेखील वगळे घोटाळताना दिसतात. कधीकधी तर या जनावरांच्या डोळ्यांवर, पाठीवर वगळोबा स्वार झालेले दिसतात. पण हा लबाड पक्षी उगीच नाही त्या जनावरांच्या जवळ जाणार, तर तिथं लभ्यांश असतो म्हणूनच स्वारी घुटमळत असते. जनावरांच्या



अंगावरचे गोचीड, गोमाशा, असली कीड त्यांना मटकवायला मिळते !

काही वगळे आकारानेही मोठे असतात आणि ते उंच आभाळातही उडतात. त्यांनाच 'बलाक' असेही म्हणतात. आकाशातून घोळक्याने एका ओळीत उडणाऱ्या बगळ्यांना

'बलाकमाला' म्हणतात. हे बगळे आपली घरटी झाडाच्या शेंड्याजवळ उंच जागीच बांधतात. पण बाकीचे मात्र झाडा-झुडपात, गवत-पाचोळ्यांची घरटी बांधतात. घरटी बांधण्यात बग-ळोबा आणि बगळीणबाई यांनी समजुतीने श्रमसहकार केलेला दिसतो. म्हणजे असे की, बगळोबा कुठून कुठून काटक्या कुटक्या, गवत-काडी इत्यादी बांधकामाचे सामान जमवून आणतात आणि मग बगळीणबाई त्यांचे बऱ्यापैकी घरटे बांधतात दोघांचा संसार गोडीगुलाबीने सुरू होतो. इतरांना फसवणारी जोडी एकमेकांना मात्र फसवत नाही, हे काय थोडे झाले !

बगळीणबाई घरट्यातच चार अंडी घालतात. उबवतात. पिलांची देखभाल वात्सल्याने करतात.

बगळ्यांच्या छातीवर म्हणे एक तुरा असतो. तो सहजा-सहजी दिसत नाही, पण असतो. त्या तुऱ्यात एक प्रकारची पाव-डर असते. या पावडरीने बगळे आपले अंग पॉलिश करून लख-लखीत आणि तुकतुकीत ठेवतात.

एरवी वरकरणी का होईना पण शांत सोज्वळ दिसणारे बगळोबा शत्रूचा समाचार घेताना मात्र मांजरीसारखे, शेपटीचे पंख फुलारून चेहरा उग्र करून तुटून पडतात. खऱ्या प्रेमात आले म्हणजे शुभ्र पंखांचे पंखे ऐसपैस उलगडून मान ताठ करून, छाती पुढे काढून 'क्वॅक्–क्वॅक्–क्वॅक्' अशा आवाजात रुंजी घालू लागतात. इंग्रज लोक बगळ्याला 'स्टॉर्क' म्हणतात. ते बहुधा या त्याच्या आवाजावरूनच असावे. बगळा हा सर्वत्र दिसणारा पक्षी आहे. काही बगळे एके ठिकाणी वस्ती करून राहणारे असतात तर काही हवामानाप्रमाणे देशोदेशी जात-येत असतात. थंड हवा

विशेष आवडते असे दिसते, कारण उष्ण प्रदेशातून थंड प्रदेशाकडेच यांची धाव असते. बगळ्यांचा गगन-संचार जेवढ्या सुलभपणाने चाललेला असतो, तेवढ्याच सहजपणाने भूमीवरची चालही जलद आणि ऐटबाज; तशीच उथळ पाण्यातही सराईत आणि वेगवान !

बाकी एवढी चपलता असल्याशिवाय का वस्तादगिरी साधणार ?

# बदक


'व रे बदकाचा' हे ज्ञान बिगारीतच मिळाले होते.पण एकदा एका तळ्यात पांढऱ्याशुभ्र रंगाच्या, गुबगुबीत अंगाच्या आणि पिवळ्या चोचीच्या तरंगत्या जिवंत होड्या पाहायला मिळाल्या आणि मन आनंदून गेले. पावसाळ्याच्या सुरुवातीला पहिल्या पावसाचे कौतुक आणि अपूर्वाई सर्वांनाच वाटते. त्यातल्या त्यात वाहत्या पाण्यात कागदाच्या होड्या करून सोडण्याची मौज त्या बालवयात विशेषच गंमतीची !

तशाच पांढऱ्या कागदाच्या पण मोठ्या आकाराच्या तरंगत्या जिवंत होड्या पाहिल्या आणि तशीच गंमत व कुतूहल वाटले.

बदकाचा आकारच तसा होडीसारखा आहे. होडी कशी दोन्ही टोकांनी निमुळती आणि मध्ये पसरट-फुगीर असते ? बदक हुबेहुब तसेच दिसते.

पाण्यात राहणाऱ्या पक्ष्यांपैकी बदक हा एक सर्वत्र भेटणारा पक्षी आहे. त्याला छान पांढरे पंख आहेत तसेच फताडे पायही आहेत. पाण्यावर तरंगताना जे बदक डौलदार, सुंदर दिसते तेच जमिनीवरच्या चिखलात कीडमुंगी टिपताना चालते तेव्हा बेडौल दिसते. ' क्वे–क्वे–क्वे ' असा आवाज काढते, तोही कानांना बरा वाटत नाही. इतक्या सुंदर अंगाच्या बदकाला असला कर्कश्य आवाज मुळीच शोभत नाही.

बदकाचे रूप मात्र सतेज देखणे असते. अंगकांती कशी लख्ख,



तुकतुकीत. पिसांना तेल लावून ती नितळ, मऊ राखण्यात बदकांना आनंद वाटत असावा. पिलू अंड्यातून बाहेर आले रे आले की बदकीणबाई त्याला पोटाशी घेऊन बसतात, त्याच वेळी त्यांच्या तोंडातून तेलासारखा स्निग्ध द्रवपदार्थ पाझरू लागलेला असतो. त्या द्रवाने पिलाचे माखणे होते आणि न्हायला तळे, नदी आहेच ! जन्मल्यापासून तास दोन तासांतच बदकांची पोरे पाण्यात उतरतात आणि सफाईने पोहू लागतात. लवकरच पाण्यावर खूप वेळ तरंगणे, सूर मारणे किंवा डुबकी घेणे यात ही बाबा बदके पटाईत बनतात.

बदकाची पिसे हलकी फुलकी असतात, त्यामुळे ती पाण्यात बुडत नाहीत. आणि आश्चर्य असे, की कितीही वेळ ती पाण्यात राहिली तरी त्यांना सर्दी पडसे होत नाही, की थंडी ताप येत नाही. येणार कसा ? भिजले तरच बाधेल ना ? म्हणजे पाण्यात राहूनही न भिजण्याची किमया बदकाजवळ आहे की काय ! तसंच आहे. शेपटाच्या मुळाशी तेलाची टाकीच असते. त्यातून चोचीने थेंब-थेंब तेल घ्यायचे आणि सर्वांगाला चोपडायचे हा फावल्या वेळातला त्यांचा उद्योग, त्यामुळे होते काय, की अंग लख्ख राहते ते राहतेच आणि एखाद्या मेणकापडासारखे 'वॉटर प्रुफ' बनते. पिसात ऊवही टिकून राहाते.

पिसात पाणी शिरू नये याची काळजी बदकांना सारखी घ्यावी लागते. त्यामुळे 'गंगेत राहून कोरडे' अशीच बदकांची स्थिती असते.

बाकी, तशी स्वच्छता बदकांना आवडतेच. ती नदीत यथेच्छ स्नान करतील, पावसात पंख पसरून मनमुराद पाणी झेलतील. घासून पुसून व्यवस्थित राहतील. बदकीणबाई आणि बदकराव यांचा जोडाही मोठा प्रेमळ. एकमेकाला जीव लावून राहतात. एकमेकांच्या सुखदु:खाला जपतात. केलेले घर मोडत नाहीत जोडलेले नाते तोडत नाहीत. बदकराव आसपासचा पालापाचोळा, गवतकाठी जमवतात, मोकळ्या जमिनीवरच घरटे रचतात. बदकीणबाई दररोज एक अंडे घालतात. महिन्याभरात पिलू बाहेर येते. तोवर उबवीत बसतात. पाण्यात जाताना मऊमऊ पिसांची दुलई अंड्यावर पांघरूण घालून जातात. न जाणो, तेवढ्यात कुणी काका मामा आला आणि त्याची खट्याळ नजर

गेली तर !

अंड्यांचा रंग मातकटच असतो. त्यामुळे सहसा ओळखूही येत नाहीत. पिले झाल्यावर त्यांची फौज घेऊन बदकीणबाई स्वतः-च पोहायला जातात. मागे-पुढे चिल्लारखाना घेऊन तृप्तपणानं संथ पोहत वसतात. एखादा मासा, एखादा बेडूक पाण्याच्या कडे-कडेने जाताना मटकावतात. पिलांनाही भरवतात. खेळवतात. कधी-कधी असा सुखाचा जलविहार चाललेला असतानाच काठावर कुणाची तरी चाहूल लागते. बदकीणबाई निमुळती मान वर करून गडद गुलाबी झाकेच्या डोळ्यांनी पाहतात. 'क्वे क्वे क्वे' करून पिलांना सावधगिरीचा इशारा देतात. चिटुकली पिलेही बेटी हुशार ! पटकन पाण्यात बुडी मारून अदृश्य होतात.

वदक तसे भित्रेच असते. शत्रूपासून संरक्षण करायचे तर सरळ पाण्याचा आश्रय घेते किंवा चापट, रुंद आणि अंमळ मोठ्या धारदार चोचीची तलवार परजते. पण हा लढवय्या जीव नव्हे. युद्धाची खुमखुमी मुळीच नसते. शांत, स्वस्थ कौटुंबिक जीवनात वदकाला आनंद मिळतो.

पांढऱ्याशुभ्र बदकाप्रमाणेच काही काळ्या कबऱ्या रंगाचीही असतात. काहींची पिसे पांढरी तर मान काळी असते. काहींच्या गोऱ्या रंगावर काळ्या ठिपक्यांचे गोंदवणही आढळते. चोची-सारखेच पाय पिवळे. बोटात रुंद पडदा. त्यामुळे पोहायला उत्तम वल्हयासारखे उपयोगी, पण चालताना मात्र बेढव दिसणारे.

कोंबड्याप्रमाणे बदकेही पाळतात आणि त्यांची अंडी भक्षण करतात.ओळखीचे घर,ओळखीचा परिसर आणि ओळखीचा आवा-

जही बदकांना ओळखता येतो. पाळीव बदकांप्रमाणेच नील-बदक व पाणबदक अशा जातींची बदकेही असतात. सायबेरिया, तिबेट या देशांतून तिकडील हिवाळ्याच्या थंडीचा त्रास वाचवण्यासाठी हजारो मैलांचे अंतर कापून काही पाणबदके भारतात येत असतात.

# राजहंस

एक होते तळे. त्यात होती बदकांची पिले. पिले होती खूप, पण एक होते कुरूप. बिचारे पिलू ! त्याच्याशी कुणी बोलायचे नाही, त्याच्याशी कुणी खेळायचे नाही. पिलू एकटे एकटेच राही, मनात आपल्या हिरमून जाई. बाकीची पिलं खटचाळ, द्वाड. कुरूप पिलाला चिडवायची फार. कुणी म्हणायचे वेडोबा, कुणी म्हणायचे बावळोबा. सगळे करायचे हिडिस् फिडिस्. पाहून हसायचे फिदीफिदी. बिचारे पिलू रडरड रडायचे, पाण्याकाठच्या सांदीत बसायचे. ना कुणाशी बोलायचे, कुणाशी हसायचे. पिलू मनात झुरायचे.

दिवसामागून दिवस गेले. पिलू थोडे मोठे झाले. एकदा त्याने काय केले? पाण्यात चोरून वाकून पाहिले. पाणी कसे संथ निळे, जणू आरसाच असे तळे ! तळयाच्या आरशात पिलाने पाहिले. आणि त्याला कळून आले–' नाही रे नाही, आपण कुरूप नाही ! कुरूप तर नाहीच पण बदकही नाही. आपण आहोत राजहंस !'

आणि स्वत:चीच स्वत:ला अशी जेव्हा ओळख पटली तेव्हा त्या पिलाची भीती पार पळाली. ते डौलानं, मान वर करून, पंख फुगवून ऐटीने तळयात हिंडू फिरू लागले. त्याचा तो पांढराशुभ्र रंग, डौलदार मान, गुबगुबीत सुरेख अंग आणि लांबलचक चोच टोकाला थोडी काळी. जणू गोऱ्या गोऱ्या रूपाला दृष्ट

लागू नये म्हणून ही काळी तिट्टी! तशाच पिवळसर नाकपुड्या आणि तसेच पाणीदार, चिमकुले डोळे! वा–वा! किती सुंदर पक्षी हा! आता काय बिशाद होती त्याला चिडवायची नि नावं ठेवायची! बदकाची पोरं लाजून हिरमून पळाली कुठच्या कुठे.

या गोष्टीतल्या राजहंसासारखाच खराखुरा राजहंसही असाच देखणा, शुभ्र मोतीदाणा असतो. वरी आठवण झाली. लहानपणी ऐकलं होतं की राजहंस पक्षी मोत्यांचा चारा खातो म्हणून. फार फार नवल वाटलं होतं ऐकून. आणखी असंही वाचलेलं आठवतंय की, दूध आणि पाणी मिसळून त्याच्यापुढं ठेवलं तर तो फक्त दूध तेवढं पितो नि पाणी तसंच ठेवतो. खरं खोटं माहीत नाही, पण हा 'हंसक्षीरन्याय' अजब वाटतो!

राजहंसाच्या खाण्यापिण्यावरल्या ह्या दंतकथा कपोलकल्पित धरल्या तरी त्याच्या डौलदार चालीची तारीफ मात्र खोटी किंवा अवास्तव वाटत नाही! 'राजहंसीचे चालणे' पाहून अप्सरेसारख्या सुंदर स्त्रीलाही हेवा वाटला आणि तिने तशी चाल उचलली. डौलदार चालण्याला हंसीच्या चालण्याची उपमा अद्यापही दिली जाते. आणि ते मान वेळावणे तरी किती गोड! किती लवचिक नि किती बाकदार! छे! छे! हातात पकडणे अशक्य. तिथे शब्दात कशी पकडणार? गोड गळ्याच्या गवयाच्या तानेइतकीच ती तरल आणि लयदार असते आणि दिसते.

हा पक्षी जेवढा सुंदर तेवढाच प्रेमळ आहे. राजहंस आणि राजहंसीण एकमेकांवर फार प्रेम करतात. नदी, सरोवर किंवा तळ्याच्या काठीच जमिनीवर, पाला-पाचोळा, काटक्याकुटक्या जमवून ओबड-धोबड पण दाट घरट बांधतात. राजहंसीण उन्हा-




BVBK-0400108

ळच्याच्या दिवसांत म्हणजे मे महिन्याच्या सुमारास सात-आठ अंडी घालते. ती उबवायला राजहंसही तिला मदत करतो. पांढुरक्या अंड्यातून दीड-एक महिन्यानंतर पिटुकली पिले बाहेर येतात. जन्मताच ती पांढरीधोप नसतात, तर किंचित करड्या रंगाची असतात.

जाता जाता आणखी एक सांगतो. की राजहंसही काळे कुळ-कुळीत असतात. काही तर अंगाने गोरेपान असले तरी मानेपासून काळे असतात. पण सर्वसामान्यपणे राजहंस पांढरा म्हणूनच ख्यात-नाम आहे. तो आढळतोही जगाच्या पाठीवर बहुतेक सगळीकडे. आफ्रिकेत व सहारा वाळवंटाच्या प्रदेशात मात्र स्वारी आढळत नाही.

राजहंस हा प्रवासी पक्षी आहे. ऋतुमानाप्रमाणे ते देशो-देशी फिरत असतात. दिवसा तसा रात्रीही त्यांचा जथा उडताना



दिसतो. भक्कम पाय आणि मजबूत पंख त्याला लाभलेले आहेत. त्याची चाल अतिशय वेगवान आहे.

आले लक्षात, म्हणूनच नलराजाने दमयंतीला निरोप देण्यासाठी हंस-दूताची योजना केली असावी. 'हे पाखरू मजसि येइल काय कामा ?' असा प्रश्न आधी ज्या नलराजाला पडला होता तोच त्या चतुर पक्ष्याचे बोलणे ऐकून नंतर म्हणाला,

"भला माझा तू हंस गडी राया ।।
विरहदुस्तर–विस्तार निस्तराया ।।"

आणि हा हंस-दूत कसा दिसत होता याचे वर्णन तर फार बहारीचे आहे–

'गमे चंपक–कुसुमौघ–हार झेला ।।
पाठवाया युवतीस सिद्ध केला ।।'

पण हाच जर शत्रूपुढे शड्डू ठोकून उभा राहिला तर काय करतो माहीत आहे ? आपले दोन्ही वलदंड पंख ताठ उभारतो, गळा फुलवतो आणि मान मागे खेचून फुत्कारणाऱ्या नागफणीसारखी चोच पुढे करून डोळ्यांतून अंगार पसरू लागतो.

लाडात असला म्हणजे मात्र दोन्ही पंख समांतर रीतीने पसरून मान उंच करतो. तारस्वरात ओरडतो.

राजहंस मोती खातो की दूध पितो ठाऊक नसले तरी कमल फुलांचे देठ खातो हे जाहीर आहे. काही राजहंस असे शाकाहारी असले तरी काही मात्र कीडमुंगी, जलकीटक मटकावीत असतात. मानस-सरोवराचा हा रहिवासी सर्वांना प्रिय झालेला आहे–

'असा पक्षी लक्षी, बहु-विह-ग-लक्षीं न मिळता ।'